४(१) ख (एक)

## ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाची रचना (सुधारीत आकृती बंधाप्रमाणे)

जुन २०१५

| अ.क | अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव | मंजुर पदे | सद्यस्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | भरलेली | रिक्त | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | प्रकल्प व्यवस्थापन | | | | |
| | १. प्रकल्प संचालक | १ | १ | ० | |
| २. | स्वयंरोजगार शाखा | | | | |
| | १. स.प्र.अ.(पशुसंवर्धन) | १ | १ | -- | |
| | २. स.प्र.अ. (उद्योग) | १ | -- | १ | |
| | ३. लिपीक | २ | २ | -- | |
| ३ | महिला शाखा | | | | |
| | १. स प्र अ (महिला) | १ | १ | -- | |
| | २. तांत्रिक सहाय्यक | १ | १ | -- | |
| | ३. लिपीक टंकलेखक | १ | १ | -- | |
| ४ | रोजगार शाखा | | | | |
| | १. स प्र अ (रोजगार) | १ | १ | -- | |
| | २. तांत्रिक सहाय्यक | १ | ० | १ | |
| | ३. लिपीक टंकलेखक | १ | १ | -- | |
| ५ | पाणलोट शाखा | | | | |
| | १. लिपीक | १ | १ | -- | |
| ६ | अभियांत्रिकी शाखा | | | | |
| | १. उपअभियंता | १ | १ | -- | |
| | २. क.अभियंता | २ | २ | -- | |
| | ३. तांत्रिक सहाय्यक | १ | १ | -- | |
| ७ | वित्त शाखा | | | | |
| | १. लेखाधिकारी | १ | १ | -- | |
| | ३. स ले अ | २ | २ | -- | |
| | ४. वरिष्ठ लेखा लिपीक | २ | २ | -- | |
| | ५. लिपीक | १ | १ | -- | |
| ८. | सनियंत्रण शाखा | | | | |
| | १. स प्र अ (सनि) | १ | ० | १ | |
| | २. विस्तार अधिकारी (सां) | १ | १ | -- | |
| | ३. लिपीक | १ | १ | -- | |
| ९ | सामान्य प्रशासन शाखा | | | | |
| | १. क.प्र अ | १ | १ | -- | |
| | २. सहाय्यक (वरिष्ठ) | २ | २ | -- | |
| | ३. लघुलेखक (निम्नश्रेणी) | १ | १ | -- | |
| | ४. कॉम्प्युटर प्रोग्रामर | १ | ० | १ | |
| | ५. वाहनचालक | ३ | २ | १ | |
| | ६. परिचर | ४ | ४ | ० | |
| १० | विस्तार अधिकारी (एग्राविका) | ८ | ७ | १ | |
| | एकुण | ४५ | ३९ | ६ | |

## कलम ४ (१) (ख) (एक)
## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्य व कर्तव्य यांचा तपशिल

| अ.क्र. | शाखा व पदनाम | कार्य व कर्तव्य | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापन<br>प्रकल्प संचालक | कार्यालय प्रमुख म्हणून सर्व कामे | |
| २ | एनआरएलएम शाखा | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान योजनेतंर्गत बचत गटाचे कामकाज | |
| ३ | महिला शाखा | महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत बचतगटांच्या महिलांचा सहभाग वाढविणे | |
| ४ | रोजगार शाखा | रमाई आवास व राजीव गांधी आवास योजनेचे कामकाज | |
| ५ | पाणलोट शाखा | एकात्मिक पडीक जमिन विकास कार्यक्रम योजनेचे काम | |
| ६ | अभियांत्रिकी शाखा | इंदिरा आवास योजना इ. तांत्रिक अभिप्राय | |
| ७ | वित्त शाखा | सर्व योजनांचे लेखा विषयक कामे | |
| ८ | संनियंत्रण शाखा | सर्व योजनांचे संनियंत्रण यामध्ये पत्रव्यवहार / रिपोर्टींग इ. | |
| ९ | सामान्य प्रशासन शाखा | सर्वसाधारण प्रशासन व अनुषंगीक कामे | |

कलम ४(१)(ख)(दोन)

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील अधिकारी / कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य यांचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | अधिकार व कर्तव्य | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्रकल्प संचालक | कार्यालय प्रमुख | |
| २ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (पशुसंवर्धन) | म.रा.ग्रा.जी.अ. अतंर्गत आर्थिक/भौतिक उद्दिष्ट साध्य करणेस पाठपुरावा | |
| ३ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (उद्योग) | म.रा.ग्रा.जी.अ. अतंर्गत आर्थिक/भौतिक उद्दिष्ट साध्य करणेस पाठपुरावा/टीटीसी/ मिनी आयटीआय नियंत्रण | |
| ४ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (रोजगार) | राजीव गांधी घरकुल योजना व रमाई आवास घरकुल योजना आर्थिक/भौतिक उद्दिष्ट साध्य करणे | |
| ५ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (संनियंत्रण) | कार्यालयीन पत्रव्यवहार/रिर्पोर्टींग यावर नियंत्रण व सर्व योजनांचे आर्थिक / भौतिक उद्दिष्ट साध्य करणे पाठपुरावा | |
| ६ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (महिला शाखा) | म.रा.ग्रा.जी.अ. अतंर्गत विविध योजनेत महिलांचा सहभाग वाढविणेस पाठपुरावा | |
| ७ | उप अभियंता | इंआयो/रआयो/राजीवगांधी घरकुल योजना व इ. बांधकामे व इतर कामाचे तांत्रिक नियंत्रण | |
| ८ | लेखाधिकारी | लेखा शाखेवर नियंत्रण/ सर्व योजनांचा निधी वेळेत प्राप्त करून घेणे इ. | |
| ९ | शाखा अभियंता | इंआयो/रआयो/राजीव गांधी घरकुल योजना इ. बांधकामे व इतर कामाचे तांत्रिक नियंत्रण | |
| १० | सहाय्यक लेखा अधिकारी | लेखा विषयक कामकाज | |
| ११ | कार्यालयीन अधिक्षक | प्रशासकिय संनियंत्रण | |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | लेखा विषयक काम व योजनेंतर्गत कार्यालयाने सोपविलेली कामे, पत्रव्यवहार / रिर्पोर्टींग इ. | |
| १३ | वरिष्ठ सहाय्यक (लि.व) / अन्वेषक | आस्थापना काम व योजनेंतर्गत कार्यालयाने सोपविलेली कामे, पत्रव्यवहार / रिर्पोर्टींग इ. | |
| १४ | लिपीक | योजनेंतर्गत कार्यालयाने सोपविलेली कामे, पत्रव्यवहार / रिर्पोर्टींग इ. | |

कलम ४ (१) (ख) (तीन)

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली :

कलम ४ (१) (ख) (चार)

स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके

कलम ४ (१) (ख) (पाच)

त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणार नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख

**केंद्र / राज्य शासनाच्या नियमावलीनुसार (मॅन्यूअल) सर्व योजनांची (लेखाविषयक/प्रशासकिय) अंमलबजावणी करण्यात येते.**

कलम ४ (१) (ख) (सहा)

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयामधील उपलब्ध दस्तऐवजाची यादी

| अक्र. | योजना | दस्तऐवज प्रकार | |
|---|---|---|---|
| | | लेखाविषयक | प्रशासकिय |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना | कॅशबुक / लेजर इ. | पत्रव्यवहार / रिपोर्टींग / प्रशासकिय मान्यता इत्यादी बाबत स्वतंत्र संचिका |
| २ | संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना | | |
| ३ | इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व राजीव गांधी घरकुल योजना | | |
| ४ | लेखा | | |
| ५ | आस्थापना | सेवा पुस्तिका | कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संचिका इ. |

कलम ४ (१) (ख) (सात)
आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अअंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल :

**केंद्र / राज्य शासन नियमावलीनुसार सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.**

कलम ४ (१) (ख) (आठ)
आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तीच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्याचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण :

**नियामक मंडळ बैठक / जिल्हास्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती बैठक / कार्यकारी समिती बैठक इत्यादी बैठकासाठी स्वतंत्र अशी सदस्यांची समिती आहे. या समितीच्या बैठका नियमित घेण्यात येतात. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्वांसाठी खुले आहेत.**

कलम ४ (१) (ख) (नऊ ) :- आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका
कलम ४ (१) (ख) (दहा) :- आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे वेतन

जुन २०१५

| अ.क | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | मिळणारे वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ६ | ७ |
| १. | डॉ श्रीमती आर एस सातपुते | प्रकल्प संचालक | २२२९७५ | ६५७४३ |
| २. | डॉ के.डी.सांगळे | स.प्र.अ. (पशुसंवर्धन) | २२२९७५ | ७७६७१ |
| ३. | श्री.एस डी तायडे | स.प्र.अ.(रोजगार) | २२२९७५ | ४४९११ |
| ४. | श्री.एस.एम.हुसेनी | उप अभियंता | २२२९७५ | ७९५५९ |
| ५. | श्री ए एस मोहिते | लेखा अधिकारी | २२२९७५ | १२९७३ |
| ६. | श्री. डी टी जाधव | कार्यालयीन अधिक्षक | २२२९७५ | ३०१४५ |
| ७. | श्री. एफ. आर. माने | ल.लेखक | २२२९७५ | ५३६९६ |
| ८. | श्री. आर.एन.मोहिते | शाखा अभियंता | २२२९७५ | ७३५०४ |
| ९. | श्री. डी.एस. कदम | शाखा अभियंता | २२२९७५ | ६३१६७ |
| १०. | श्री. पी एस शिराळे | शाखा अभियंता | २२२९७५ | ६२६३३ |
| ११. | श्री. एस.डी. जाधव | स.ले.अ. | २२२९७५ | ४७४६७ |
| १२. | श्री. के.एन.थोरात | स.ले.अ. | २२२९७५ | ३६७०४ |
| १३. | श्री. एम.एस.मोटे | वि.अ. (सां) | २२२९७५ | ४४५८६ |
| १४. | श्रीमती ए व्ही पतकी | व.स.ले. | २२२९७५ | ३७४२० |
| १५. | श्री बी आर जानकर | व.स.ले. | २२२९७५ | २८८२७ |
| १६. | श्री. बी.एस.मठपती | क.स. | २२२९७५ | २६९१६ |
| १७. | श्रीमती के आर थोरात | क.स. | २२२९७५ | २५४२० |
| १८. | श्रीमती एस.आर.चव्हाण | क.स. | २२२९७५ | १९३६६ |
| १९. | श्री टी एस शेजाळ | क.स. | २२२९७५ | २८८२७ |
| २०. | श्री आर व्ही भिसे | क.स. | २२२९७५ | २०५०९ |
| २१. | श्री बी एम ढगे | क.स. | २२२९७५ | २५७८९ |
| २२. | श्री. आर.ए. निकाळजे | स.प्र.अ.(करार) | २२२९७५ | १२००० |
| २३. | श्री. यु.ए.पाटील | तांत्रिक सहा.(करार) | २२२९७५ | ९००० |
| २४. | श्री. के.टी. शिंदे | लिपीक (करार) | २२२९७५ | ७००० |
| २५. | श्री. आर बी जगदाळे | वाहनचालक | २२२९७५ | २७८१४ |
| २६. | श्री. एन.बी. राऊत | वाहनचालक | २२२९७५ | २५५७३ |
| २७. | श्री. बशीर अहमद | शिपाई | २२२९७५ | २३६०४ |
| २८. | श्री. एस.बी. स्वामी | शिपाई | २२२९७५ | २५७५२ |
| २९. | श्री. आर.एम. गव्हाणे | शिपाई | २२२९७५ | २२२५९ |
| ३०. | श्रीमती आर एम गुरव | शिपाई | २२२९७५ | १७१०३ |

| अ.क | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | पदनाम | दुरध्वनी क्रमांक | मिळणारे वेतन |
|---|---|---|---|---|
| ३१. | श्री.पी.एम.गलांडे | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७७-२३२०२८ | ३६४८७ |
| ३२. | श्री.डी.टी.सांळुके | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७१-२४२०४० | ५२३५४ |
| ३३. | श्री.जी.व्ही.गवळी | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७८-२७६९०० | ४२२५४ |
| ३४. | श्री.एच.जी.करबलवाड | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७८-२७०२८ | ५५२४१ |
| ३५. | श्री. एस.एम.चप्पलवार | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७२-२२२१५७ | ४५५९३ |
| ३६. | श्री.ए.जी.बोयणे | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७२-२२२१५७ | ४११९६ |
| ३७. | श्री पी एस कांबळे | विस्तार अधिकारी (आयआरडीपी) | ०२४७५-२२१२५४ | ४३४७५ |

कलम ४ (१) (ख) (अकरा, बारा)

(अकरा) सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्याचा तपशील

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत खालील योजना राबविण्यात येतात.**

१. **महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत कामकाज**

२. **इंदिरा आवास योजना**

३. **रमाई आवास योजना**

४. **राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना भाग-२**

**सोबत वरील सर्व योजनांचा प्रगतीदर्शक तक्ता व योजनांची मार्गदर्शक टिपणी जोडली आहे**

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

उस्मानाबाद जिल्हयामध्ये सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षापासुन राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान **Intensive, Semi Intensive** व **Non-Intensive** या कार्यपध्दतीने राबविण्यात येत आहेत.

- **Intensive तालुके** - उस्मानाबाद, तुळजापूर व लोहारा
- **Non-Intensive तालुके** - उमरगा, कळंब, वाशी, भूम व परंडा

**अभियानाचे प्रमूख उद्दिष्टे :-**

- दारिद्रयाचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामीण गरीबांना एकत्र आणणे.
- त्यांच्या सक्षम संस्था उभारणे
- संस्थामार्फत गरीबांना वित्तीय सेवा पूरविणे.
- गरीबांची व त्यांच्या संस्थाची क्षमतावृध्दी व कौशल्यवृध्दी करणे.
- शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देवून त्यांना दारिद्रयाच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे.

**अभियानाची उद्दिष्टे :-**

- ग्रामीण भागातील गटामधील गरीबातील-गरीब कुटुंबापर्यंत पोहचून त्या कुटुंबातील किमान एका महिलेचा स्वयंसहाय्यता गटामध्ये समावेश करणे, या गरीबांच्या संस्था स्थापन करुन त्यांचे बळकटीकरण करणे, त्यांना शासन व बँकामार्फत अर्थसहाय्य उपलबध करुन देऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन गरीबीच्या बाहेर पडण्यासाठी मदत करणे.

**अभियानातील लक्ष्य गट :-**

- राज्याच्या ग्रामीण भागातील गरीबातील गरीब कुटुंब हे अभियानाच्या केंद्रस्थानी आहे. या गरीब कुटुंबामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती भटक्या विमूक्त जाती व जमाती यांच्या बरोबरच अन्य जाती जमाती व खूला प्रवर्गातील गरीबांतील गरीब व्यक्ती अभियानातील लक्ष्य गट आहेत. समाजातील महिला, अपंग, भूमीहीन, अत्यल्प व अल्पभू-धारक, प्रकल्प बाधित स्थलांतरीत मजूर, बेठबिगार, निराधार, परितक्त्या, विधवा, एकलव्यक्ती, तृतीयपंथी, जोगीण, देवदासी, वेश्या, मानवी मैला वाहतूक करणारे इ. वंचित घटकांना संघटन क्षमता बांधणी व अर्थसहाय्य या माध्यमातून जीवनोन्नतीची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**स्वयं सहाय्यता गटस्थापना :-**

- स्वयंसहाय्यता समूहात समाजातील आचार-विचाराने एकमेकाशी जुळणाऱ्या किंवा समान उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन आलेल्या महिलांचा समूह असतो.
- स्वयंसहाय्यता गट म्हणजे स्वत:, स्वत:ची सहाय्यता करणारा गट होय.
- स्वयंसहाय्यता समुहामध्ये सर्वसाधारण किमान १० ते कमाल २० महिलांचा समावेश असावा तथापि अपंग, वयोवृध्द, वेश्या व्यवसायी महिला, मानवी मैला वाहतूक करणाऱ्या व्यक्ती व तृतीय पंथी या सारख्या विशेष प्रवर्गाच्या बाबतीत ही संख्या ५ पर्यंत शिथिलक्षम राहील.

**दशसुत्री**

१. नियमीत बैठक
२. नियमीत बचत
३. अंतर्गत कर्ज वितरण
४. कर्जाची नियमीत परतफेड
५. गटाचे लेखे अद्यावत ठेवणे
६. नियमीत आरोग्याची काळजी घेणे
७. शिक्षण विषयक जागरुकता वाढविणे
८. पंचायत संस्थाबरोबर नियमीत सहभाग
९. शासकीय योजनांमध्ये नियमित सहभाग
१०. शाश्वत उपजीवीकेसाठी उपाय योजना

**फिरता निधी (खेळते भांडवल)**

साधारणत: दशसुत्रीचे पालन करणाऱ्या ३ ते ६ महिने कालावधी पूर्ण केलेल्या स्वयंसहाय्यता समूहांना प्रथम श्रेणीनुसार प्राप्त गुणांच्या प्रमाणात

१. श्रेणी **"अ"** ६० ते ७५ गुण रु.१५०००/- २. श्रेणी **"ब"** ५९ ते ५० गुण रु.१२०००/-

२. श्रेणी **"क"** ४४ ते ४० गुण रु.१००००/-

वरील प्रमाणे फिरता निधी देण्यात येतो. फिरता निधीची रक्कम बँकामार्फत थेट स्वयंसहाय्यता गटाच्या बचत खात्यावर वर्ग करण्यात येते.

**अनुज्ञेय अर्थसहाय्य :-**

**१. प्रथम अर्थसहाय्य**

गटाची स्थापना झाल्यानंतर ६ महिन्यामध्ये आणि फिरता निधी मिळाल्यानतंर साधारणतः ३ महिन्यामध्ये देण्यात येते. गट जुना असल्यास किमान ३ महिने दशसुत्रीचे पालन करणाऱ्या गटास श्रेणीनुसार पात्र स्वयंसहाय्यता गटांना त्यांच्या एकुण बचतीच्या ४ ते ८ पट किंवा किमान रु.५००००/- यापैकी जी रक्कम अधिक असेल तेवठे अर्थ सहाय्य देण्यात येते. ६ ते १२ महिने परतफेडीचा कालावधी.

**२. दुसरे अर्थसहाय्य :-**

पहिल्या अर्थसहाय्याची संपूर्ण परतफेड करणाऱ्या स्वयंसहाय्यता गटास एकुण बचतीच्या ५ ते १० पट किंवा रु.१ लाख यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढे अर्थसहाय्य देण्यात येते. १२ ते २४ महिन्याच्या कालावधीत परत करण्यात येते.

**३. तिसरे अर्थसहाय्य :-**

स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखडयाच्या (ऍक्टीव्हीटी) किमंतीनुसार किंवा किमान २ ते ५ लक्ष रक्कमे ऐवढे हे अर्थसहाय्य दशसुत्रीचे सर्वसाधारण पालन करण्याऱ्या गटास दुसरे अर्थसहाय्य ९० टक्के किंवा तपेक्षा किती अधिक रकमेची परतफेड केल्यानंतर देण्यात येते. २ ते ५ वर्षाच्या कालावधीत परतफेड करण्यात येते.

**४. चौथै अर्थसहाय्य :-**

स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखडयाच्या (ऍक्टीव्हीटी) किमंतीनुसार किमान रुज५ ते १० लक्ष रकमेएवढे हे अर्थसहाय्य दशसुत्रीचे सर्वसाधारण पालन करणाऱ्या गटास तीसरे अर्थसहाय्य ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची परतफेड केल्यानतंर देण्यात येते. ५ ते ६ वर्षाच्या कालावधीत परतफेड करण्यात येते.

**व्याज अनुदान तरतूद :-**

- एमएसआरएलएम अंतर्गत ७० टक्के सदस्य दारिद्रय रेषेखालील असलेल्या महिलांच्या गटांना व्याज अनुदान अनुज्ञेय व देय राहील.
- यापूर्वी घेतलेल्या कर्जावर भांडवली अनुदान मिळालेले असल्यास असा कर्जाच्या शिल्लक रकमेचया परतफेडीवर व्याज अनुदान देता येणार नाही तथापी संपूर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर ३ लक्षच्या मर्यादेत नव्याने घेतलेल्या कर्ज रक्कमेवर व्याज अनुदान अनुज्ञेय राहील.
- केंद्र शासन समूहांना बँकामार्फत ७ टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. बँक व्याजदर व ७ टक्के व्याजदर यामधील तफावती एवढी रक्कम केंद्र शासन व्याज अनुदान म्हणून बँकेमार्फत गटाच्या खात्यावर उपलब्ध करुन देणार आहे.

**कौशल्यसाठी रोजगार निर्मिती :-**

- ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबासाठी एक कुटुंब एक नोकरी निर्माण करणारी कौशल्ये विकसीत करण्याचे शसनाचे धोरण आहे.
- यामधून संपूर्ण कुटुंब दारिद्रय रेषे बाहेर आणण्यासाठी हातभार लागू शकेल या उद्देशाने या योजनेत कौशल्य विकास या घटकावर भर देण्यात आलेला आहे.
- बेरोजगार युवक व युवकामधील कौशल्य विकसित करुन जिल्हयातील इंडस्ट्री असोसिएशन आणि चेबर ऑफ ऑफ कॉमर्स इतर कोशल्य विकास आणि ऐवजी रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या संस्ाि यांच्याशी विचार विनियम करुन रोजगार निर्मितीच्या संधीचा शोध घेण्यात येईल. त्यानुसार रोजगार निर्मितीचे जिल्हयात लद्युप्रकल्प तयार करण्यात येतील.

# <u>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,उस्मानाबाद</u>

## इंदिरा आवास योजना

इंदिरा आवास योजनेतंर्गत ग्रामीण भागासाठी केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासन यांच्या अधिनस्त उस्मानाबाद जिल्हयासाठी ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी ग्रामपंचायत स्तरावरुन करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने निवा-याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटावा म्हणून सदर योजना शासन निर्णय क्र. इंआयो-२०१०/प्र.क्र.३४/योजना-१० दि.१२ डिसेंबर २०११ अन्वये दारिद्रय रेषेखालील बेघर लाभार्थ्यांची कायम प्रतिक्षायादी प्रमाणे तालुका घटक गृहीत धरुन चढत्या क्रमाने गावाची निवड करण्यात येते. शासन परिपत्रक क्र.इंआयो-२०१४/प्र.क्र.०१/यो-१० दि.१२ फेब्रुवारी २०१४ अन्वये प्रति घरकुल १,००,०००/- प्रमाणे मंजुरी देण्यात येते.

१. लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील असून घरकुलाच्या प्रतीक्षायादी मध्ये असणे आवश्यक आहे.
२. लाभार्थीने इतर शासकीय घरकुलांच्या योजनेतुन लाभ घेतलेला नसावा.
३. लाभार्थी कायमस्वरुपी गावातील रहीवाशी असावा.
४. घरकुल बांधकामाची किंमत प्रति घरकुल रु. १,००,०००/- आहे.
५. घरकुलाचे चटई क्षेत्र किमान २६९ चौ. फुट असावे.
६. लाभार्थ्यांचा हिस्सा ५ ./.टक्के असतो.
७. घरकुलासोबत शौचालय बांधकाम अनिवार्य आहे.

सन २०१२-१३ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत ३०३८ घरकुलांचे उद्दिष्ट होते.त्यापैकी आजतागायत २८५२ घरकुले पूर्ण असून उर्वरीत घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सन २०१३-१४ मध्ये १५३१ घरकुलांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी १५३१ घरकुले आजतागायत पूर्ण असून सन २०१४-२०१५ मध्ये १९२५ उदिष्ट प्राप्त झाले आहे त्यापैकी एकुण ११८० घरकुले पुर्ण झालेली आहेत उर्वरित घरकुलाचे कामे प्रगतीपथावर आहेत. इंदिरा आवास योजना सन २०१५-१६ साठी एकुण ८९३ घरकुलाचे उदिष्ट शासनाकडुन प्राप्त आहे.

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद

## -: रमाई आवास योजना :-

रमाई आवास योजनेंतर्गत (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजना ) अनु.जाती व नवबौध्द घटकासाठी ग्रामीण व शहरी भागासाठी ग्राम विकास व गृह निर्माण विभागामार्फत योजना राबविल्या जातात. सदर योजना उस्मानाबाद जिल्हयात सन २०१०-२०११ पासुन राबविण्यात येत आहे.

अनुसूचित जातीच्या व्यक्तींना त्यांच्या बिकट परिस्थितीमुळे स्वतःच्या उत्पन्नातुन चांगल्या प्रकारे पक्के घर बांधणे शक्य होत नाही . ग्रामीण भागातील बहुतांश लोक कच्च्या घरामध्ये राहतात. म्हणून राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या लोकांना त्यांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने व त्यांच्या निवा-याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटावा म्हणून सदर योजना शासन निर्णय क्र. बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/ मावक-२ मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२ दिनांक १५ नोव्हें २००८ अन्वये लागू करण्यात आलेली आहे. शासन ज्ञापन क्र. रआयो २०१४/ प्र.क्र.१०/बांधकामे मंत्रालय मुंबई दिनांक- १८/०७/२०१४ अन्वये दिनांक १ एप्रिल २०१३ पासुन रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये - एक लाख.)अनुदेय आहेत.

- लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावा.
- लाभार्थी इतर शासकीय योजनेतून घरकुलासाठी लाभ घेतलेला नसावा.
- लाभार्थी कायमस्वरुपी गावातील रहिवाशी असावा व त्याला स्वतःची जागा असावी. किमान १५ वर्ष (महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य)
- लाभार्थी दारिद्रय रेषेखालील यादीत असावा.
- घरकुल बांधकामाची किंमत रु. १,००,०००/-
- घरकुलाचे चटई क्षेत्र २६९ चौ.फुट
- लाभार्थी हिस्सा निरंक

### वर्षनिहाय प्राप्त उद्दिष्ट व भौतिक स्थिती (जुन २०१५)

- सन २०१४-१५ मध्ये शासनामार्फत उद्दिष्ट प्राप्त नाही.

| अ. क्र | वर्ष | प्राप्त उद्दिष्ट | मंजूर घरकुले | रद्द घरकुले | शिल्लक घरकुले | पूर्ण घरकुले | प्रगतीत असलेली घरकुले | स्तंभ ८ पैकी सुरु नसलेली घरकुले | रद्दसाठी प्राप्त प्रस्ताव | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | २०१०-२०११ | २९२२ | २९२२ | ४८५ | २४३७ | २०३५ | ४०२ | ० | ९३ | ८३.५० | |
| २ | २०११-२०१२ | ४०५५ | ४०४९ | ३१४ | ३३४५ | २४९३ | ८५२ | ५ | १६५ | ७४.५२ | |
| ३ | २०१२-२०१३ | ३२७ | ३१४ | ३९० | ३१४ | १४७ | १६७ | ४० | १४ | ४६.८१ | |
| ४ | २०१३-२०१४ | ७०० | ७२२ | ० | ७२२ | २२५ | ४९७ | ४४ | १९७ | ३१.१६ | |
| ५ | २०१४-२०१५ | निरंक | निरंक | ० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकुण | ८००४ | ८००७ | ११८९ | ६८१८ | ४९०० | १९१८ | ८९ | ४६६ | ७१.८६ | |

- सन २०११-१२ मधील उद्दिष्टापैकी ३२७ घरकुलांचे उद्दिष्ट दिनांक १९/०३/२०१२ ला प्राप्त झाले. तथापि सदर घरकुलांना दिनांक ४/०३/२०१४ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.त्यामुळे सदर घरकुलांना वाढीव निधी देण्याबाबत शासनास पत्र क्र.८६/२०१५ दि-२८/०१/२०१५ अन्वये मार्गदर्शन मागविले असुन अद्याप प्राप्त नाही.

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना भाग -२

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेवरील (राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रमांक-२) शासनाने शासन निर्णय क्र.गृनियो-२००५/प्र.क्र.२४/गृनिधो-१, दिनांक २९ नोव्हेंबर ,२००५ अन्वये जाहिर केलेली असून सदर योजनचे भौतिक उद्दिष्ट शासनाने गृहनिर्माण विभागाचे परिपत्रक क्र.गृनियो-२००६/प्र.क्र.२२/गृनिधी-१ दिनांक २० एप्रिल २००६ अन्वये सर्व जिल्हयांना ठरवून दिले आहे, उस्मानाबाद जिल्हयासाठी राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रं.२ साठी प्रत्येकी ८७० इतके भौतिक उद्दिष्ट ठरवून दिले आहे. तसेच शासनाने गृहनिर्माण विभागाचे परिपत्रक क्र.गृनियो-२००८/प्र.क्र.९२/गृनिधी-१ दिनांक २७ ऑगस्ट २००८ अन्वये उस्मानाबाद जिल्हयासाठी (सुधारित) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रं.२ साठी प्रत्येकी २१७५ इतके भौतिक उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

(सुधारित) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रं.२ अंतर्गत दारिद्रय रेषेवरील कुटूंबाना ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.९६,०००/- पेक्षा कमी आहे, अशा कुटूंबाना घरकुलाचा लाभ दयावयाचा आहे. सदर योजनेंतर्गत घरकुलाची किमंत रु.१,००,०००/- असून त्यासाठी लाभार्थी कुटूंबाना वित्तीय संस्थाकडून रु.९०,०००/- कर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहे व लाभार्थीचा हिस्सा रु.१०,०००/- इतका आहे. सदरील योजनेचा निधी हा संबंधित दत्तक बॅंकेकडुन कर्ज स्वरुपात संबंधित बॅंकेचे निकषानुसार पात्र लाभार्थीस देण्यात येणार.

**योजनेचे स्वरुप :-**

१. प्रति घरकुल बांधकाम खर्च रु.१.०० लक्ष.
२. निधी उभारण्यांची पध्दत.
३. लाभार्थीचा स्वताचा सहभाग रु.१०,०००/-
४. बॅंकेकडुन कर्ज स्वरुपात रु.९०,०००/-
५. कर्ज परतफेडीचा कालावधी ९ वर्ष राहील कर्ज परतफेडीचा मासीक हप्ता रु.८३३/- एवढा असेल.
६. कर्ज परतफेडीच्या हमीपोटी घरकुल त्याखालील जागेसह तारण/गहाण संबंधित दत्तक बॅंकेकडे ठेवावे लागेल.
७. लाभार्थीना दहा वर्षाच्या कालावधीसाठी बॅंकेकडून विमा सरक्षण दिले जाईल त्यासाठी लाभार्थीला तीन हजार रु.एक रक्कमी भरावे लागतील.
८. कर्जावरील व्याजाची रक्कम परतफेड गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ औरंगाबाद मार्फत भरण्यांत येईल.
९. या योजनेतील घरकुलासाठी प्रामुख्याने लाभधारकांची स्वत:ची भूखड ७५० चौ.फुट असणे अवश्यक आहे.नसल्यास संबंधित ग्रामपंचायत/तहसिलदार यांनी संबंधित लाभधारकांस शासकिय/गायरानामधील वरील प्रमाणे भूखंड देणे बाबतचे निर्देश आहेत.उपलब्ध जागेवर किमान २६९ चौ.फूट चटई क्षेत्राचे घरकुल स्वत: बांधावयाचे आहे.
१०. घरकुलासाठी प्रस्तावीत केलेली जागा बोजाविरहित असल्याबाबतचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी / तहसिलदार, यांचे असणे अवश्यक आहे.
११. लाभधारकांने कर्ज परत फेड करण्यांस दिरगाई केल्यास व त्याकारणाने बॅंकेने लाभधारकांवर नियमानुसार कोणतीही दंडनिय अकारणी केल्यास अशी कोणती रक्कम शासनाकडून भरली जाणार नाही व त्याबाबत सदर बाबतीत शासन अथवा हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
१२. सदर योजनेंतर्गत लाभार्थीची निवड ही ग्रामसभेव्दारे करण्यांत येवून संबंधित लाभधाकरकांचा सविस्तर प्रस्ताव संबंधित पंचायत समिती मार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडे सादर करण्यांत येत आहे.
१३. संबंधित पंचायत समिती मार्फत प्राप्त होणारे अर्ज अग्रणीय बॅंकेने सुचविलेल्या संबंधित बॅंक शाखेकडे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून कर्ज मंजूरीस्तव पाठविण्यांत येत आहेत.

१४.कर्ज मागणीच्या अर्जावर संबंधित बॅक कडून शोध अहवाल घेण्यांत येवून त्यांचे निकषानुसार पुढील कार्यवाही करण्यांत येते.

१५. कर्जापोटी करावयाचे तारण /गहाण व्यवहारात समन्याय गहाण पध्दत अथवा साधे गहाण पध्दत स्विकारण्यांत येते.

१६.कर्ज नामंजूर केलेल्या प्रकरणात त्याबाबतची लेखी कारणे बॅकेने नमूद करणे अवश्यक आहे.

१७. कर्ज मंजूर करणा-या लाभार्थायांची यादी संबंधित दत्तक बॅकेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांची प्रशासकिय मान्यता घेण्यांत येत.

१८. सदरील योजने अंतर्गत लाभार्थीने स्वतःचे घरकुल स्वतःच बांधव्याचे असुन त्यासाठी लागणारे अवश्सक ते तांत्रिक साहय संबंधित पंचायत समितीस्तरावरील शाखा अभियंता/कनिष्ट अभियंता यांचे राहील.

१९. कर्ज मंजुरी करण्यांत आलेल्या प्रकरणांत कर्जाची रक्कम दोन सुलभ हप्त्यात म्हणजे रु.४०,०००/-पहिला हप्ता व रु.५००००/- चा दुसरा हप्ता संबंधित लाभधारकांस उपलब्ध केला जातो.

२०. उपरोक्त घरकुल बांधकामामध्ये एक बहोउद्येशिय रुम, बाथरुम व शौचालय चे बांधकाम करणे आवश्यक आहे.

२१. कर्जाचा पहिला हप्ता वितरीत झालेनंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल.पहिल्या हप्त्याद्वारे प्राप्त झालेल्या रक्कमेचा विनियोग योग्य कामासाठी झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित पंचायत समितीचे शाखा अभियंता यांनी बॅकेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

कलम ४ (१) (ख) (तेरा)
ज्या व्यक्तिंना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशिल

**निरंक**

कलम ४ (१) (ख) (चौदा)

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशिल

**योजनानिहाय मासिक प्रगती अहवाल / प्रशासकिय मान्यता आदेश / पत्रव्यवहार इ. माहिती उपलब्ध आहे.**

कलम ४ (१) (ख) (पंधरा)

माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधाचां तपशिल, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशिल

१. **कार्यालयात प्रत्येक योजनाचे माहितीचे बोर्ड माहितीसाठी उपलब्ध आहेत.**
२. **योजनांच्या माहितीचे चार्ट, मॅन्युअल, पुस्तके, घडीपत्रीका इ. उपलब्ध आहेत.**

कलम ४ (१) (ख) (सोळा)

| अ.क्र. | शाखेचे नाव | जन माहिती अधिकारी | सहा.जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्वरोजगार व महिला शाखा | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (सनियंत्रण) | विस्तार अधिकारी (सां) | प्रकल्प संचालक |
| २ | रोजगार व अभियांत्रिकी शाखा | | शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता | प्रकल्प संचालक |
| ३ | पाणलोट शाखा | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | प्रकल्प संचालक |
| ४ | वित्त शाखा | | सहा.लेखाधिकारी | प्रकल्प संचालक |
| ५ | सामान्य प्रशासन शाखा | | कार्यालयीन अधिक्षक | प्रकल्प संचालक |

कलम ४ (१) (ख) (सतरा)
विहित करण्यात येईल आशी इतर माहिती

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांची आर्थिक / भौतिक प्रगती इत्यादी सर्व माहिती उपलब्ध आहे.**

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
उस्मानाबाद